आर बी आय / २००४-०५/ ४४९
डी बी ओ डी. क्र. बीएल. बीसी. ८६/२२.०१.००१/ २००४-०५

एप्रिल ३०, २००५
वैशाख १०, १९२७ (श)

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
( आर आर बीज सोडून )

प्रिय महोदय,

**बँकव्यवहार विनियमन अधिनियम, १९४९ चे कलम २३-डोअर-स्टेप बँकिंग**

कृपया, आमचे परिपत्रक डी बी ओ डी. क्र. बी एल- बीसी. ४२/ सी-१६८. ८३ दिनांक मे २४, १९८३ (प्रत जोडली आहे) चा संदर्भ घ्यावा. यात आपणास सूचित करण्यात आले होते की, भारतीय रिझर्व बँकेची आवश्यक ती परवानगी घेतल्याशिवाय बँकांनी त्यांच्या ग्राहकांच्या परिसरात बँकेची कोणतीही सुविधा दिली जाऊ नये.

२. रेल्वे इत्यादि सरकारी विभागांकडून आलेल्या, त्यांची रोख रक्कम गोळा करणे यासह इतर बँकसेवा त्यांच्या परिसरात दिल्या जाव्यात, अशा अनेक विनंतीचा, तसेच त्यासाठी बँकांनी दिलेल्या निवेदनांचा विचार करून असे ठरविण्यात आले आहे की, बँक व्यवहार विनियमन अधिनियम, १९४९ च्या कलम २३ च्या साच्यात राहून, ग्राहकाला त्याच्या परिसरात सेवा देण्यासाठी, एखादी योजना बँकांनीच त्यांच्या मंडळाची मंजूरी घेऊन तयार करावी, आणि रिझर्व बँकेच्या मंजूरीसाठी पाठवावी असे ठरविण्यात आले.

३. दरम्यान, केंद्र आणि राज्य सरकारांच्या विभागांची गैरसोय होऊ नये म्हणून, प्रतिनिधी बँकांनी, केंद्र व राज्य सरकारांच्या विभागांच्या परिसारातून रोकड व पतसंलेख गोळा करण्याचे काम सुरु ठेवावे.

आपला विश्वासू

(आनंद सिन्हा)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक